|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
Umavinagar, Jalgaon - 425 001, (M.S.) INDIA
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/११/पीएच.डी./रुपरेषा/१२१० /२०२५ दिनांक :३०/१२/२०२५

**महत्वाचे**

प्रति :
१. सर्व संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक, कबचौउमवि, जळगाव.
२.सर्व मान्यताप्राप्त पदव्यूत्तर संशोधन केंद्राचे प्रमुख तथा प्राचार्य, कबचौउमवि, जळगाव.

**विषय:-** पीएच.डी. च्या तात्पुरत्या प्रवेशित विद्यार्थ्यांना संशोधनाचे शिर्षक व रुपरेषा करण्यासंदर्भात सुचना/कार्यवाही करणेबाबत मुदतवाढ देणेबाबत.
**संदर्भ:-** विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक ८९/२०२५ दि.१५/१२/२०२५

महोदय/महोदया,

वरील संदर्भिय परीपत्रकान्वये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामार्फत पीएच.डी.प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या पीएच.डी. प्रवेश पुर्व परिक्षेत जे विद्यार्थी उत्तीर्ण आहे किंवा ज्यांना परीक्षेतून सुट देण्यात आली आहे अशा विद्यार्थ्यांचे प्री.पीएच.डी. कार्सवर्कचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्री.पीएच.डी. कोर्सवर्क पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाचे शिर्षक व रुपरेषा अंतिम स्वरूप देणेकामी ती, मान्यताप्राप्त संशोधन सल्लागार समितीपुढे सादर करून त्यास मान्यता घ्यावयाची आहे. संशोधन सल्लागार समितीने (RAC) मान्य केलेली रूपरेषा त्यांच्या लॉगीन मधून **दि.३१/१२/२०२५ पर्यंत** अपलोड करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतू काही संशोधक मार्गदर्शक यांनी वरील बाब लॉगीनमधुन अपलोड करणेसाठी कमी वेळ मिळाल्यामुळे मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

सदरची संशोधन सल्लागार मितीने मान्य केलेली रूपरेषा त्यांच्या लॉगीन मधून अपलोड करणेसाठी दि.१५/०१/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

संशोधन प्रस्तावाच्या (शिर्षक व रूपरेषा) प्रत्येक पानावर (परीपत्रक क्र.५८/२०२४ मधील मुद्दा क्र. ८(e) अन्वये गठीत) संशोधन सल्लागार समितीच्या सदस्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. संशोधक मार्गदर्शक यांनी संशोधन संल्लागार समितीच्या (Research Advisory Committee) सभेची, विद्यार्थ्यांसह उपस्थिती अहवालाची नोंद ठेवावी. सर्व संशोधक मार्गदर्शक यांनी त्यांच्या विषयातील मान्यताप्राप्त संशोधन केंद्रात संशोधन सल्लागार समितीचे आयोजन (ऑनलाईन/ऑफलाईन) पध्दतीने **दि.१५/०१/२०२६ पर्यंत** होईल असे नियोजन करावे.

(प्रविण एम. चंदनकर)
सहा.कुलसचिव (अ.का.) संशोधन विभाग